VJTI MUMBAI
वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था
Veermata Jijabai Technological Institute
(Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
H. R. Mahajani Road, Matunga (East), Mumbai - 400 019
Phone:+91 22 24198101/102 • Fax:+91 22 24102874 • www.vjti.ac.in

क्र.लेखा / शिवृ./ महाडीबीटी / ACAP / ST / २०२३-२४ / ७६६३ / २०२४ दिनांक : १२/०१/२०२४

12 JAN 2024

परिपत्रक :

## शिष्यवृत्ती कार्यासन

## अनुसूचित जमातीच्या (S.T.) Against CAP मधून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याबाबत

सदर परिपत्रकाद्वारे पालक व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील संस्थेतील सर्व पदवी, पदविका, एम.सी.ए., आणि एम.टेक प्रथम ते चतुर्थ अभ्यासक्रमास शिकत असणाऱ्या अनुसूचित जमाती S.T. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे की, आदिवासी विकास विभाग यांचा शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०२२ नुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ज्या विद्यार्थ्यांनी Against Cap / Sopt Round द्वारे प्रवेश घेतला आहे अशा विद्यार्थ्यांना MahaDBT पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनांचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. असे नमूद करण्यात केले आहे.

परंतू, **आदिवासी विकास विभाग यांचा आदेश क्रमांक : क्र:-व्यअप्र-२०२१ / प्र.क्र.९४ / का.१२ दिनांक ०९ जानेवारी, २०२४ नुसार Against Cap / Sopt Round द्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना MahaDBT पोर्टलवर Post Matric Scholarship Scheme (Government of India) व (Vocatinal Educationa Fee Reimbursement) या योजनांचा लाभ अनुज्ञेय राहणार आहे.**

तरी, संस्थेतील अनुसूचित जमाती S.T. प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी त्वरीत MahaDBT पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरून घेणे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज न केल्यास व विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहील्यास त्यास सर्वस्वी विद्यार्थी व पालक जवाबदार राहतील याची गांर्भियाने नोंद घेण्यात यावी.

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE MATUNGA, MUMBAI -19.

अध्यक्ष
शिष्यवृती समिती

सोबत :
शासन निर्णय

प्रत : सर्व विभागप्रमुख, मुलामुलींचे वसतीगृह, संस्थेचे संकेतस्थळ

मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

आदिवासी विकास विभाग

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
पहिला मजला, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

☎- 022 2204 7156 Email- usdesk12.tdd@gov.in


क्रः-व्यअप्र-२०२१/प्र.क्र.९४/का.१२
दिनांक : ०९ जानेवारी, २०२४

प्रति,
आयुक्त,
आदिवासी विकास, नाशिक

विषय- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ३१.१०.२०२२ च्या शासन निर्णयानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी Admission Type-Spot Round मधून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुरु करण्याबाबत किंवा अर्ज करण्याची संधी न मिळाल्याने Admission Type- Govt/ Cap Quota Tab निवडून अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना cap ची सक्ती न करणेबाबत.

सदंर्भ : आपले पत्र क्र. शिष्यवृ-२०२३/प्र.क्र.०१/का. ६(०९)/७४५३, दि. ०६.११.२०२३

महोदय,

विषयांकित प्रकरणी राज्यातील शासन मान्यताप्राप्त, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील योजनेत "Spot Round किंवा Mock up Round" द्वारे निवडलेल्या विद्यार्थ्यांना दि. ३१.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये पात्र केले आहे. परंतू दि. १७.०१.२०२२ शासन निर्णयातील मुद्दा क्र. ५ मधील अ. क्र. ०९ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रतिपूर्ती केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियामार्फत (Cap) प्रवेश असलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील व ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश Against Cap मध्ये असतील त्यांना अनुज्ञेय असणार नाही असे स्पष्ट नमूद असल्याने Spot Round मध्ये प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश Against Cap मध्ये होत असल्याने सदर पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करावे किंवा कसे याबाबत शासनस्तरावरुन योग्य ते आदेश होण्याबाबत संदर्भाधिन पत्राद्वारे विंनती केली आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी नमूद करण्यात येते की, दि. ३१.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील शासन मान्यताप्राप्त, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रतिपूर्ती योजनेत Spot Round मध्ये निवडलेल्या विद्यार्थ्यांना पात्र केले असल्याने सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश हे Cap मधून आहेत किंवा Against Cap मध्ये आहेत याबाबत पाहणी न करता सदर विद्यार्थी Spot Round मार्फत प्रवेशित

असल्याची खात्री करुन सदर विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क अदा करण्यास पात्र ठरविण्यात यावे. हे करतांना विद्यार्थ्यांचे प्रवेश Management level Quota द्वारे झाले असल्यास त्यास शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहणार नाही याची दक्षता घ्यावी, ही विनंती.

आपला,

LALITKUMAR
RANGNATH
DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=77ee43feb646b7ae43865425ca1d67a75cd7607fae62a4e9bad488155d6d28, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2024.01.09 17:39:00 +05'30'

(ललितकुमार धायगुडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत: व्यस्थापकीय संचालक, महाआयटी, ३ रा मजला, ॲपीजे हाऊस, के.सी.कॉलेजजवळ, चर्चगेट, मुंबई-४०००२० यांना उचित कार्यवाहीस्तव

प्रत: निवडनस्ती (कार्यासन-१२)